पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी, पुणे – ४११ ०१७
ड प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्र. १०
विशेष सभा सभावृत्तांत

दिनांक : २६ /०४/२०१८ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड प्रभाग समितीची विशेष सभा गुरुवार दिनांक २६ एप्रिल २०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालील प्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. कदम शशिकांत गणपत सभापती
२. मा. श्रीमती वाघमारे आश्विनी सदस्या
३. मा. श्रीमती ममता विनायक गायकवाड सदस्या
४. मा.श्री. कामठे तुषार गजानन सदस्य
५. मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश सदस्या
६. मा. श्री. कस्पटे संदिप अरूण सदस्य
७. मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे सदस्य
८. मा. श्रीमती कुटे निर्मला संजय सदस्या
९. मा. श्री.आंगोळकर सागर सुनिल सदस्य
१०. मा. श्रीमती मुंढे उषा अंकुश सदस्या
११. मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू सदस्या

---------------

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री. विजय एकनाथ खोराटे , क्षेत्रीय अधिकारी, मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी, मा.अशोक बोनगीर, लेखाधिकारी,मा. राजेंद्र गोरे, मा. विनायक फापाळे, वरिष्ठ लिपीक, मा. गणेश घाडगे, लिपीक उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व सभेस सुरुवात झाली.

मा. सभापती यांचे सुचनेनुसार प्रशासन अधिकारी यांनी सभेच्या कार्यपत्रिकेतील विषय क्र. १ चे वाचन केले. त्यानुसार ड क्षेत्रिय कार्यालयाकडे बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटनांचे ३ (तीन) नामनिर्देशित सदस्यांची निवड करणेकामी मुदतीत प्राप्त झालेल्या एकूण १५ अर्जांपैकी १० नामनिर्देशनपत्र वैध ठरली आहेत. सदर वैध १० नामनिर्देशनपत्रामधून ३ स्वीकृत सदस्यांची निवड करावयाची आहे. प्रशासन अधिकारी यांनी सदर वैध नामनिर्देशनपत्रातील खालील उमेदवारांच्या नावांचे वाचन केले.

| अ.क्र. | नामनिर्देशन फॉर्म दाखल क्रमांक | उमेदवाराचे नांव | प्रस्तावित संघटनेचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|
| १ | २ | श्री. भुजबळ चेतन हुशार | जय गगनगिरी तरुण मंडळ, कै.पै.समीर भुजबळ चौक, पुनावळे, जि. पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ६ | श्री. ढवळे नवनाथ मारुती | ढवळे एज्युकेशन सोसायटी, सर्व्हे नं. ३८, ढवळेनगर, मु.पो. पुनावळे. जि. पुणे |
| ३ | १९ | श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव | जय बजरंग तरुण मित्र मंडळ, भुमकर नगर, वाकड, पुणे |
| ४ | २० | श्री. विनोदे राहुल आनंदा | नवयुग मित्र मंडळ, विनोदे नगर, वाकड, पुणे |
| ५ | १८ | श्री. जगताप महेश दत्तात्रय | श्री छत्रपती शिवाजी मित्र मंडळ, तुळजाभवानी नगर, पिंपळे गुरव, पुणे – ६१ |
| ६ | १७ | श्री. दुधारे शशिकांत मनोहर | मराठवाडा जनविकास संघ. आनंद पार्क बिल्डींग, पिंपळे गुरव, पुणे - ६१ |
| ७ | ४ | श्री. दर्शले सुरेश संपत | श्री संत सावतामाळी तरुण मंडळ, पुनावळे, ता. मुळशी, जि. पुणे |
| ८ | ११ | श्री. नखाते संदीप भानुदास | शिवछत्रपती मित्र मंडळ, शिवाजी चौक, रहाटणी, पुणे १७ |
| ९ | ७ | श्री. कस्पटे प्रसाद बाळासाहेब | साईराज प्रतिष्ठान , सर्व्हे नं. २३१, कस्पटेवस्ती, वाकड, पुणे ५७ |
| १० | २३ | श्री. दौंडकर अविनाश आनंदा | हिंद मित्र मंडळ सेवा ट्रस्ट, विशालनगर, पिंपळे निलख, पुणे - २७ |

मा.सभापती यांनी सर्व उपस्थित सदस्य यांना वैध १० उमेदवारांमधून ड प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य पदासाठी सर्वानुमते तीन सदस्यांची प्रभाग समितीवर सदस्य म्हणुन नामनिर्देशन करणेबाबत निवड करण्यास सुचविले.

त्यानंतर सर्व उपस्थित सदस्यांनी खाली नमुद केलेल्या तीन उमेदवारांची एकमताने नांवे मा. सभापती यांना सुचविली.

१. श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव
२. श्री. नखाते संदीप भानुदास
३. श्री. जगताप महेश दत्तात्रय

ठराव क्र. ०१ विषय क्र. १

दिनांक: २६/०४/२०१८ विभाग : प्रशासन विभाग

सुचक :- मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे, अनुमोदक :- मा. श्रीमती ममता विनायक गायकवाड

संदर्भ : मा. क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील दि. २३/०४/२०१८ रोजीचा प्रस्ताव

ड क्षेत्रिय कार्यालयाकडे बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटनांचे **<u>३ (तीन)</u>** नामनिर्देशित सदस्यांची निवड करणेकामी मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी वैध १० नामनिर्देशनपत्रामधून सर्व ड प्रभाग समिती सदस्यांनी एकमताने खाली नमूद केलेल्या तीन नामनिर्देशित सदस्यांची निवड करण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

१. श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव
२. श्री. नखाते संदीप भानुदास
३. श्री. जगताप महेश दत्तात्रय

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

------------

**मा.सभापती** यांनी सर्व उपस्थित सदस्यांनी एकमताने सुचविल्याप्रमाणे वरील नामनिर्देशित सदस्य म्हणुन एकमताने निवड करण्यात येत असल्याचे जाहिर केले.

सही/-
सभापती,
ड प्रभाग समिती, रहाटणी,
पुणे – ४११ ०१७

प्रति,
सर्व संबंधित

सही/-
प्रशासन अधिकारी, सभाशाखा,
ड प्रभाग समिती
रहाटणी, पुणे – ४११ ०१७

क्र. डप्र/सभा/कावि/ १०८/२०१८
दि. ०४/०५ / २०१८

प्रति,
मा.श्री/श्रीमती --------------
सदस्य/सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
रहाटणी, पुणे – ४११ ०१७
प्रत : संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी